सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक- सीसीटीएनएस-३६१५/ प्र. क्र.२०२/ भाग-३/ पोल-३, दि.२२/०९/२०२५

**विषय :-** सीसीटीएनएस प्रकल्पांचे सिस्टीम इंटिग्रेटर मे. डेलॉईट कंपनी (M/S DELOITTE) यांना रु.७,३९,८६,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणे, मुदतवाढ देणे. तसेच सीसीटीएनएस प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी कं. च्या सल्लागारांना मुदतवाढ देणे.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक.-सीसीटीएनएस-३६१५/ प्र. क्र.२०२/भाग-३/पोल-३ ,दि.२२/०९/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९२२१७१२३१७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 27-09-2025 19:42:45

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**सीसीटीएनएस प्रकल्पाचे सिस्टीम इंटिग्रेटर मे. डेलॉईट कंपनी (M/s Deloitte) यांना रु.७,३९,८६,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणे, मुदतवाढ देणे. तसेच सीसीटीएनएस प्रकल्प सल्लागार मे.पीडब्ल्युसी कं.च्या सल्लागारांना मुदतवाढ देणे.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-३/पोल-३, मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०००३२.**

**दिनांक : २२ सप्टेंबर, २०२५**

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांकः- एमआयएस ०५०८/७४८/प्र. क्र.३२९/पोल-४. दि.२२.०५.२००९.

२) महाराष्ट्र शासन आणि मे. विप्रो लि. यांचे दरम्यान दि.२२.०३.२०१२ रोजी झालेला करारनामा.

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५.

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील SEC (State Empowered Committee) समितीच्या दि.४.७.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दि.१२.०७.२०१६ व दि.२८.१२.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

६) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१७.०१.२०१७, दि.२०.०७.२०२०, दि. १८.५.२०२१, दि.१६.११.२०२१, दि. १०.५.२०२२, दि. ४.११.२०२२, दि.१२.७.२०२३, दि. २१.९.२०२३ व दि. २९.१.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

७) शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटीएनएस ३६१५/प्र.क्र. २०२/ भाग-३/ पोल-३, दि.१.७.२०२२ व दि.२१.७.२०२३. दि.८.१.२०२४

८) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-५/पोल-३, दि.२९.८.२०२३.

९) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४ / २०१४-O/O Directorate of IT-DIT (MH), दि. ५.१०.२०२३

१०) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि.९.५.२०२२ व दि.१३.१.२०२३. व दि.२९.८.२०२३, दि. ३०.१.२०२५, दि. १६.७.२०२५.

११) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-६/पोल-३, दि.१२.१२.२०२४.

१२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९५/ई-१११६६१६/पोल-३, दि.२.६.२०२५.

१३) अपर पोलीस महासंचालक (गुन्हे अन्वेषण विभाग) पुणे यांचे मे. डेलॉईट कंपनीला दिलेले क्र.० No.: CID/SCRB/ CCTNS / ९०२/२०२३, Pune दि.८.११.२०२३ चे कार्यादेश.

१४) अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) पोलीस महासंचालक कार्यालय, यांचे पत्र क्र. पोमसं/१७/६१६२/सीसीटीएनएस प्रकल्प/ १५/२०१०, दि.२१.८.२०२५ चे पत्र.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत राज्यात सीसीटीएनएस प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन २०१५ मध्ये राज्यातील १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरिष्ठ पोलीस कार्यालय CAS (Core Application Software) सॉफ्टवेअरव्दारे जोडण्यात आले असून सदर कार्यालयांमध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे दि.१५.०९.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या

हस्ते लोकार्पण पार पडले आहे. सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जोडण्यात आलेल्या १०५४ पोलीस ठाणी व ६२९ वरीष्ठ कार्यालयामध्ये २ mbps नेटवर्क कनेक्टिव्हीटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्प हा केंद्र पुरस्कृत होता परंतु मार्च २०१८ नंतर या प्रकल्पास केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणार नाही, असे केंद्र शासनाने कळविले आहे. सबब सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींकरीता येणारा खर्च राज्य शासनामार्फत करणे आवश्यक आहे. त्यानुसार सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि. १२.७.२०२३ च्या राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीत सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करीता रु.१३०,७४,५४,७५३/- इतक्या Committed Non Committed खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सीसीटीएनएस प्रकल्पाच्या सिस्टीम इंटिग्रेटर मे. विप्रो लि. या कंपनी बरोबर दि.२२.३.२०१२ रोजी पाच वर्षांसाठी सेवा करार करण्यात आला व दि. १५.९.२०१५ रोजी प्रकल्प प्रत्यक्ष कार्यान्वित झाला. सदर कराराची मुदत दि. १४.९.२०२० रोजी संपुष्टात आली होती.

| अ. क्र. | सीसीटीएनएस प्रकल्प पुरवठादार | मुदतवाढ दिल्याचा शासन पत्र / निर्णय याचा दिनांक | मुदतवाढ दिलेला कालावधी | मुदतवाढ कालावधीसाठी प्रशासकीय मान्यता रुपये. |
|---|---|---|---|---|
| १ | मे. विप्रो लि. | २०.७.२०२० SAC बैठकीत मुदतवाढीचा निर्णय झाला. | १५.९.२०२० ते १४.९.२०२१ | |
| २ | मे. विप्रो लि. | ९.५.२०२२ | १५.९.२०२१ ते १४.९.२०२२ | ९,५१,४३,८५०/- |
| ३ | मे. विप्रो लि. | १३.१.२०२३ | १५.९.२०२२ ते दि.१४.९.२०२३ | ९,९५,९२,०००/- |
| ४ | मे. विप्रो लि. | २९.८.२०२३ | १५.९.२०२३ ते नविन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत | ९,९५,९२,०००/- |
| ५ | मे. डेलॉईट कं. | ८.१.२०२४ | १.१२.२०२३ ते ३०.११.२०२५ | ७,३९,८६,०००/- |
| ६ | मे. डेलॉईट कं. | मुदतवाढीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर आहे. | १.१२.२०२४ ते दि.३०.११.२०२५ | ७,३९,८६,०००/- |

वरीलप्रमाणे सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.१.२०२५ रोजी झालेल्या राज्य शिखर समिती (State Apex Committee) च्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रकल्पाचे System Integrator म्हणून मे. डेलॉईट यांना दि.१.१२.२०२४ ते दि.३०.११.२०२५ या कालावधीकरिता येणाऱ्या अंदाजित खर्च रु.७,३९,८६,०००/- इतक्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यतेसह मुदतवाढ देण्यातबाबतचे तसेच प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी कं. यांचे १ वरिष्ठ सल्लागार व २ सल्लागार यांना दि.१.११.२०२४ ते ३१.१०.२०२५ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :

सीसीटीएनएस प्रकल्पाबाबत मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.१.२०२५ रोजी झालेल्या राज्य शिखर समिती (State Apex Committee) च्या बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रकल्पाचे System Integrator म्हणून मे. डेलॉईट यांना दि.१.१२.२०२४ ते दि.३०.११.२०२५ या कालावधीकरिता येणाऱ्या अंदाजित खर्च (जीएसटीसह) रु.७,३९,८६,०००/- इतक्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यतेसह मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी कं. यांचे १ वरिष्ठ सल्लागार व २ सल्लागार यांना दि.१.११.२०२४ ते ३१.१०.२०२५ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींसाठी येणारा खर्च “मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त निधी कोषागारातून आहरण करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रण अधिकारी” व त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे. उपरोक्त निधी सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या कामासाठी केंद्र शासनाच्या निदेशानुसार खर्च करण्यात यावा व खर्च करण्यात आलेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. प्रकल्प पुरवठादारांसदर्भात सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७(अ), नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार आणि प्रकल्प सल्लागाराच्या संदर्भात शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार, मधील अनुक्रमांक ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५ अनुसार व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शिखर समितीच्या (SAC) दिनांक २९.१.२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९२२१७२१२३१७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.09.22 17:22:13 +05'30'

**(रा.ता. भालवणे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (नि व स), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
११. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.

१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१७. प्रकल्प संचालक, मे. डेलॉईट प्रा.लि., मुंबई.
१८. प्रकल्प संचालक, मे. पीडब्ल्यूसी कंपनी, मुंबई.
१९. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
२०. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
२१. निवडनस्ती, पोल-३.